# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २९-०४-२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक २९ एप्रिल २०१७ रोजी (का.प.क्र ४०) मा.महापौर श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ३-३० वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम मुगळीकर, आयएएस नगरसचिव, श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ७. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| ८. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ९. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १०. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| ११. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १२. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १३. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १४. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १५. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १६. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १७. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १८. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १९. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २०. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २१. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २२. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २३. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २४. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २५. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| २६. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| २७. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |

इति.सर्व सभा दिनांक २९-०४-२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक ४०)

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| २९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३०. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ३१. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ३२. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ३३. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ३४. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ३५. | स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ३६. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ३७. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ३८. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ३९. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ४०. | स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन |
| ४१. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ४२. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ४३. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ४४. | स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ४५. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ४६. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ४७. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ४८. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ४९. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ५०. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ५१. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ५२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ५३. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ५४. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ५५. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ५६. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ५७. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ५८. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ५९. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ६०. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ६१. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ६२. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ६३. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ६४. | स.स.कु.जमादार सायली भागवत |

इति.सर्व सभा दिनांक २९-०४-२०१७
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक ४०)

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

**विषय क्रमांक ९९३:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९६ अन्वये स्थायी समितीने संमत केलेले सन २०१६-२०१७ चे सुधारित व सन २०१७-२०१८ या वर्षाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०० अन्वये अंतिम मान्यता देणे.

मा.महापौर :मा.सभापती स्थायी समिती श्री.मोहनजी धन्नुलाल मेघावाले यांचे सभागृहात आगमन झाले आहे,स्थायी समितीने सम्मत केलेला अर्थसंकल्प ते आज सर्वसाधारण सभेसमोर सादर करणार आहे. मा.सभापती यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करण्यात येते.

मुख्यलेखाधिकारी :मा.सभापती स्थायी समिती यांना विनंती की त्यांनी सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अर्थसंकल्प मा.सर्वसाधारण सभेसाठी सादर करावे.

(या वेळी मा.सभापती स्थायी समिती श्री.मोहन मेघावाले हे मा.महापौर यांचेकडे अर्थसंकल्प सादर करतात).

मा.सभापती :प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१६-२०१७ चे सुधारीत व कलम ९५ नुसार सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाज दिनांक २१/०३/२०१७ रोजी स्थायी समिती समोर सादर करण्यांत आले होते.

स्थायी समितीच्या सभेत आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सर्व सदस्यांनी सविस्तर चर्चा करून सादर झालेल्या अंदाजपत्रकावर फेरफार व दुरूस्ती करून त्यास मान्यता देण्यात आली व आज महासभेसमोर ३५ वा अर्थसंकल्प सादर करीत आहे.

शहराची वाटचाल ही सध्या स्मार्ट सिटीकडे जात असल्यामुळे, शहरातील मुख्य रस्ते मजबुतीकरण व रूंदीकरण करण्याचे बरीचशी कामे प्रगतीपथावर आहे.

सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता व मनपाची आर्थीक स्थिती बघता सर्व स.सदस्यांच्या वॉर्डामध्ये नागरी सुविधा पुरविणेच्या भावनेतून विविध विकास कामे करण्यासाठी भरीव अशी तरतुद उपलब्ध करून देण्यांत आलेली आहे. तसेच काही महत्वाच्या कामांसाठी खालील प्रमाणे तरतुदी उपलब्ध करून देण्यांत आलेली आहे.

०१. मनपामार्फत एन.यु.एच.एम. अंतर्गत शहरात ०८ रूग्णालयाचे कामे प्रगतीपथावर आहे.
०२. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनासाठी भरीव तरतुद करण्यात आली.
०३. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सर्वेक्षण करणे करीता आवश्यक तरतुद ठेवण्यात आली.

०४. शहरात दोन ठिकाणी हॉकर्स झोन विकसीत करणेसाठी तरतुद
०५. महीलांसाठी विविध ठिकाणी सुलभ शौचालय उभारणी
०६. सेफ सिटी अंतर्गत उर्वरीत ठिकाणी सि.सि.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.
०७. क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सौंदर्यीकरण करणे.
०८. स्व.बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल गार्डन सुशोभिकरण करणे.
०९. स्वामी विवेकानंद उद्यानात खेळणी बसविणे व इतर कामे करणे.
१०. शहरातील महापुरूषांच्या पुतळ्यांचे परिसर सुशोभिकरण व रंगरंगोटी करणे.
११. महात्मा ज्योतीबा फुले पुतळ्याची उंची वाढविणे व सुशोभिकरण करणे.

शहरातील प्रमुख रस्त्यांचे मजबुतीकरण व आधुनिकीकरण करणेसाठी शासन स्तरावर र.रू.१५० कोटीची विशेष अनुदानास तत्वत: मान्यता मिळाली असून त्यानुसार शहरातील विविध रस्ते गुळगुळीत करण्यांत येईल.

प्रशासनाने सादर केलेल्या मुळ अंदाजामध्ये स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, नगर रचना विभाग, शासकीय अनुदान अशा विविध विभागातंर्गत वसुलीच्या उद्दीष्टामध्ये पुढील प्रमाणे अनुक्रमे वाढ करण्यांत आली. रू.२५, रू.७०, रू.१५, रू.१० व रू.१५ कोटी वाढ असे एकुण रू.१६० कोटीची वाढ सूचविण्यात आली.

माझ्या कार्यकाळात मा.सभापती विधानसभा महाराष्ट्र राज्य श्री.हरिभाऊ बागडे, मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्रजी फडणवीस, मा.पर्यवरण मंत्री तथा पालकमंत्री श्री.रामदासजी कदम, मा.खा.श्री.चंद्रकांतजी खैरे, मा.प्रदेशाध्यक्ष भाजपा तथा खा.श्री.रावसाहेब दानवे, महिला आयोगाच्या अध्यक्षा मा.सौ.विजयाताई रहाटकर, मा.आ.संजयजी शिरसाट, मा.आ.अतुलजी सावे, मा.आ.श्री.इम्तियाजजी जलील, मा.आ.सतिषजी चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख मा.श्री.अंबादासजी दानवे, भाजपा जिल्हाध्यक्ष मा.श्री.एकनाथजी जाधव, भाजपा शहराध्यक्ष मा.श्री.किशनचंदजी तनवाणी यांचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळत गेले. तसेच मा.महापौर व सर्व स.पदाधिकारी व स्थायी समितीचे सर्व सदस्य यांनीही मला वेळोवेळी सहकार्य केले. याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे. प्रशासनाकडूनही मला मा.आयुक्त व सर्व अधिकारी, कर्मचारी यांचेकडून मोलाचे सहकार्य लाभले.

शहरातील सर्व प्रसार माध्यमे, वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी, ईलेक्ट्रानिक मिडीया या सर्वांच्या प्रतिनिधीकडूनही मोलाचे सहकार्य मिळाले, त्याबद्दलचे त्यांचेही मी आभार मानतो.

श्री.गजानन बारवाल :मा.सभापती यांनी शहराच्या विकासासाठी चांगले काम केले. सर्वाना समान न्याय मिळेल. असे बजेट सादर केलेले आहे. या बजेटमध्ये जी स्पीलची कामे आलेली नाही. ती समावेश करावी. प्रशासनाने रू.१०४१ कोटीचे बजेट सादर केले होते. स्थायी समितीने त्यात वाढ करून १११० कोटीचे बजेट या सभेसाठी सादर केले आहे. अनेक कामाचा यात समावेश केलेला आहे. पॉईन्ट १२ मध्ये नाविन्य पुर्ण अशा संकल्पना ठेवलेल्या आहेत. विविध प्रकारच्या गोष्टीचा समावेश केला त्याबद्दल मा.सभापती व सर्व स्थायी समितीचे सदस्यांचे मन:पुर्वक अभिनंदन करतो. सादर केलेले बजेट आजच दुरूस्तीसह मंजूर करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :बजेट सादर केले स्थायी समिती मा.सभापती व सर्व सदस्याचे मनपुर्वक अभिनंदन. स्वामी विवेकांनद उद्यानामध्ये महात्मा बसवेश्वर यांचे पुतळयाची जागा निश्चित केली. सुशोभिकरणाचा शुभारंभ केला. परंतु तेथील कामास गती मिळाली नाही. बजेट मंजूर करतांना एक कोटीची तरतूद त्या कामासाठी करावी. पैठणरोड वर महापालिकेची आरक्षित जागा आहे. तेथे वारकरी भवन करण्यासाठी तरतूद करावी. समतोल व सर्वांगींग विकास व्हावा. या दृष्टीने अर्थसंकल्प तयार व्हावा दुरूस्तीसह मंजूरी द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.सभापती व स्थायी समितीचे सर्व सदस्य यांनी चांगला अर्थसंकल्प तयार केला. या सर्वांचे अभिनंदन यापूर्वी अर्थसंकल्पावर अनेक वेळा चर्चा झालेली होती. जे बजेट प्रशासनाने दिले. ते एवढे मोठे कसे झाले, वसुलीचे काय झाले? ती होईल की नाही? वसुली न झाल्यास कुणावर जबाबदारी असेल? अनेक प्रश्न उपस्थित होऊ शकतात. परंतु वेळ न घालता उशीर न होता. यात विकास कामासाठी पैसे ठेवलेले आहे. आणखी काही शहराच्या विकासासाठी मा.महापौर यांनी त्यांचे अधिकाराचा वापर करून निधी देण्याचा प्रयत्न करून सर्वाना समान न्याय मिळेल सर्व समावेशक अर्थसंकल्प तयार करावा. दुरूस्तीसह मंजूर करावे १५ दिवसाच्या आत बजेट बुक तयार करावे.

श्री.प्रमोद राठोड :स्थायी समितीने अर्थसंकल्प सादर केला. त्यात प्रामुख्याने मयतासाठी शितगृह उल्लेख केलेला आहे, हॉकर्स झोन विकसित करणेसाठी तरतूद केली आदरणीय स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारकासाठी विशेष तरतूद केली. तसेच महाराणा प्रताप यांचा पुतळा व गार्डनसाठी तरतूद केली. त्याबद्दल मा.सभापती यांना धन्यवाद देतो तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी मोठी तरतूद केली. आता जी कामे थांबली आहे. ती करण्यात यावी. वसुलीवर जास्तीत जास्त भर देण्याच्या सुचना कराव्यात. यात आणखी काही कामासाठी तरतुद करावी. प्रशासनाचे सहकार्य घ्यावे. स्पीलची कामे घ्यावी. सदस्याच्या सुचनेनुसार वार्डातील आवश्यक कामे असतील. ती घेण्यात यावी. दुरूस्तीसह मंजूरी. देऊन पुढील १५ दिवसात अर्थसंकल्प तयार करण्यात यावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :सर्व समावेशक असा अर्थसंकल्प मा.सभापती यांनी सादर केलेला आहे. कब्रस्तान स्मशानभुमी येथील कामासाठी विशेष तरतूद करावी. पाणी पुरवठ्यासाठी निधीची तरतूद करावी. ज्या वार्डात कमी निधी असेल तेथे जास्तीत जास्त निधी द्यावा दुरूस्तीसह मंजूरी देण्यात यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.सभापती यांनी एक वर्षात चांगले काम केले. या बजेट मध्ये सर्व भागातील विकास कामे घेण्याचा प्रयत्न केला. स्पीलची जी कामे यात आली नाही. ती सर्व कामे यात समावेश करावी. शहराच्या विकासासाठीची मोठी कामे असेल समांतरची कामे असेल इतर सर्व महत्वाची कामे होणे आवश्यक आहे. सर्व वार्डातील कामाची निकड लक्षात घेऊन सर्व वार्डात कामे व्हावी. स्पीलची जी कामे यात आली नसतील. ती घेण्यात यावी. सर्व सदस्याच्या सुचना विचारात घेऊन त्यांचे वार्डातील जी जी महत्वाची कामे सुचवतील त्या सर्व कामाचा समावेश करावा. दुरूस्तीसह मंजुरी द्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :स्पीलची कामे यात घ्यावी, महिला बाल कल्याण समितीसाठीचा निधी शिल्लक आहे तो समावेश करावा.तो महिला व बाल कल्याण यांचे कल्याणासाठीच वापरावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :चांगले बजेट मा.सभापती यांनी सादर केलेले आहे. शादीखाना मंगलकार्यालय, कब्रस्तान स्मशानभुमी यांचे देखभाल दुरूस्तीसाठी तसेच नहर-ए-अंबारी साठी तसेच शहांगज येथील घडयाळचे टावर्स दुरूस्तीसाठी बजेटमध्ये तरतूद ठेवावी.

कु.सायली जमादार :सातारा देवळाई येथील नागरीकासाठी २०० खाटांचा दवाखाना उभारणीसाठी तसेच स्मशानभुमीसाठी तरतूद करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :स्पीलची बरीच कामे यात समावेश झाली नाही. ती यात घेण्यात यावी. मालमत्ताचे सर्वेक्षणाचे काम करण्यात यावे निविदा काढावी. खाजगी संस्थेकडून काम करून घ्यावे. उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ कसा बसविता येईल या बाबत आदेशीत करावे.

श्री.गजानन मनगटे :अत्यंत काटकसरीने मा.सभापती यांनी अर्थसंकल्प सादर केलेला आहे.सर्व वार्डातील कामाचा समावेशक असी बजेटमध्ये तरतूद केली आहे. शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने मोफत अत्यंविधीची योजना चालू होती. ती सुरू करण्यात यावी त्यासाठी तरतूद करावी. वसुलीचे नियोजन करावे मोठमोठ्या योजनेची कामे व्हावी. या योजनासाठी शासनाकडून निधी आणावा. जो वचननामा जनतेसमोर मांडला होता त्यातील ७० टक्के कामे पुर्ण होतील. जी जी कामे घेण्यात आलेली आहे व घेण्यात येणार आहे त्या सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करून मार्गी लावण्याच्या सुचना कराव्यात.

श्रीमती सुनिता आऊलवार:स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने जी मोफत अंत्यविधी योजना बंद झाली ती सुरू करावी.

श्रीमती मनीषा मुंढे :स्पीलची कामे यात घेण्यात यावी.

श्री.अय्युब जागीरदार :अर्थसंकल्प सादर झाला. मा.सभापती यांचे अभिनंदन करतो, चांगल्या पध्दतीने त्यांनी काम केले आहे. या बजेट मध्ये स्पील ओव्हरची काही कामे आली नाही ती घेण्यात यावी. स्पील मध्ये कामे जाऊ नये. याची दखल प्रशासनाने घ्यावी. तातडीने ज्या त्या वर्षातील कामे त्याच वर्षामध्ये व्हावी. वार्डनिहाय जी तरतूद असते त्याचे अंदाजपत्रक तातडीने व्हावे. जी कामे झाली नाही. त्याचाही समावेश करावा. नेहरूभवन हॉल इमारत पाडून नवीन हॉल तयार करावा. त्यासाठी तरतूद करावी. नहर-ए-अंबारी दुरूस्ती करीता तरतूद करावी. सर्व वार्डातील आवश्यक कामे यात घ्यावी. दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर :स्थायी समितीने सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यावर सभागृहात चर्चा झाली. देखभाल दुरूस्ती विकास कामासाठी स्थायी समितीने तरतूद केली आहे त्या बद्दल मा.सभापती व सर्व सदस्य यांचे अभिनंदन करण्यात येते. जे शक्य आहे तेवढी कामे यात मा.सभापती यांनी घेतली व सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. पाणीपुरवठ्यासाठी निधी दिला. सन २०१७-१८ च्या बजेटमध्ये स्पीलच्या काही कामाचा समावेश नाही. तो यात करण्यात येतो. प्रत्येक वार्डातील आवश्यक विकास कामासाठी तरतूद उपलब्ध करण्यात येईल. काही महत्वाच्या

योजनांसाठी तरतूद करावी लागणार आहे. स्थायी समितीने काही महत्वाची कामाचा समावेश केलेला आहे आणखी काही ठळक बाबी देत असून उत्पन्न वाढविण्याच्या मध्ये वाढ करीत आहेत. तितक्याच रक्कमेच्या कामाचा यात समावेश करण्यात येत आहे. उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे.ठळक बाबी मध्ये करावयाची कामे अशी की,

१. पैठण,जालना, अंजिठा,वेरूळ कडून शहराकडे येणाऱ्या रस्त्यावर प्रवेशद्वार उभारण्यात यावे.
२. खेळाळूसाठी विविध स्पर्धेत भाग घेता यावा त्यासाठी तरतूद करण्यात येते
३. गरवारे स्टेडीयम येथे जलतरण तलाव अपुर्ण आहे. तो पुर्ण करण्यासाठी तरतूद करण्यात येते.
४. गरवारे स्टेडीयम येथील व्यायाम शाळा अद्यावत करावे.
५. शहरातील महिला व मुलीसाठी बॅडमिन्टन स्पोर्ट उभारण्यात यावे. त्यासाठी तरतूद करण्यात येते.
६. बसवेश्वर महाराज तसेच संत गाडगे बाबा महाराज पुतळयासाठी तरतूद करण्यात येते.
७. मनपाच्या मालकीच्या जागाचे संरक्षणासाठी संरक्षित भिंत बांधाण्याकरीता तरतूद करण्यात येते.
८. नारेगावचा कचरा डेपो बंद करण्याचे मा.न्यायालयाचे निर्देश आहे. त्या दृष्टीकोनातून वेगवेगळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यंत्रणा उभी करण्यासाठी व कचरा प्रोसीसींगसाठी यंत्र सामुग्री घेण्याकरीता तरतूद करण्यात येते.
९. योगा प्रशिक्षण व्यायाम करण्याकरीता विविध उद्यानामध्ये ओपन जीम ची व्यवस्था करण्यासाठी तरतूद करण्यात येते.
१०. पैठण रस्त्यावर वारकरी भवन व्हावे. अनेक नागरीकांची जनतेची मागणी आहे. त्यानुसार वारकरी भवन हे आषाढी एकादशीच्या दिवशी त्या भवनाचे उद्‌घाटन व्हावे. त्यासाठी तरतूद करण्यात येते.
११. शहरात हातपंप, विहिरी असेल नहर-ए-अंबारी आहे. यातून शहरात अनेक भागात पाणी देऊ शकतो. या कामासाठी तरतूद करण्यात येते.
१२. सातारा-देवळाई झोन कार्यालयासाठी तरतूद करण्यात येते पाण्याच्या टाकीसाठी तरतूद करण्यात येते.
१३. जालना रोडवर मुकूंदवाडी भागातील स्मशानभुमी विकसीत करण्यासाठी तरतूद करण्यात येते.
१४. विविध ठिकाणी असलेले कब्रस्तान,स्मशानभुमी विकसीत करण्यासाठी तरतूद करण्यात येते.
१५. मनपाचे मोठे मल्टी स्पेशालिस्टी हॉस्पीटल साठी तरतूद करण्यात येते.
१६. स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने असलेली मोफत अंत्यविधी योजना सुरू करण्यात यावी. त्यासाठी तरतूद करण्यात येते.

स्थायी समितीने सुचिविलेल्या बजेटमध्ये स्थानिक संस्था करात ३०० ऐवजी ३२५ कोटी, मालमत्ता वसुली ३०० ऐवजी ३७० कोटी नगररचना विभागाची वसुली १२५ वरून १५० कोटी, वसुलीचे टारगेट देण्यात येते,

शासनाकडील येणारे अनुदान पोटी उद्दिष्ट १०६ कोटी करण्यात येते तर पाणीपट्टी वसुलीचे उद्दिष्ट १२७ ऐवजी १४७ कोटीची करण्यात येते. वाढीव केलेले उद्दिष्ट प्रशासनाने पुर्ण करावे. सर्वानी उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.स्थायी समितीने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर सर्व सन्माननिय सदस्य यांनी सर्वकष अभ्यास करून चर्चा केली. सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता, या अर्थसंकल्पामध्ये सर्व प्रभागात विकास कामे करण्याची सर्व सदस्यांची मागणी आहे. तथापि, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असून सुध्दा वरील सर्व बाबींचा विचार करून सन्माननिय सदस्यांच्या वॉर्डामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या भावनेतून विकास कामे करण्यासाठी जमाबाजुच्या अंदाजामध्ये वाढ सुचविण्यात येऊन देखभाल दुरूस्ती व विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

स्मार्ट सिटीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये महानगरपालिकेचा समावेश झालेला असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कराची वसुलीची टक्केवारी ८०% होणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील नव्या मालमत्तेचा शोध घेणे, मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसूत्रता यावी व प्रभावीपणे वसुली करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन ज्या विभागात अनावश्यक कर्मचाऱ्यांपैकी वसुली विभागासाठी २५% वाढीव व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा. स्थायी समितीने सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये जमा व खर्चाच्या अंदाजामध्ये सर्व वॉर्ड अभियंता कार्यालयाकडून विविध प्रभागातील उर्वरित स्पिल ओव्हरच्या कामांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आलेला आहे. तसेच काही विशिष्ट कामांसाठी सुध्दा तरतुद उपलब्ध करून दिलेली आहे.

स्थायी समिती मार्फत महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व १०४ अन्वये सन २०१६-१७ चे सुधारीत अर्थसंकल्पिय जमा रु.५८० कोटी ९६ लक्ष ६५ हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक ७५ कोटी ०१ लक्ष ८४ हजार असे एकुण ६५५ कोटी ९८ लक्ष ४९ हजार व खर्च रु.५८६ कोटी ६० लक्ष ३० हजार विचारात घेऊन रु.६९ कोटी ३८ लक्ष १९ हजार शिलकीच्या सुधारित अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

उपरोक्त नुसार स्थायी समितीने सादर केलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये फेर फार, दुरूस्ती व वाढ करून सन २०१७-१८ करीता महानगरपालिकेचा मुळ अंदाजपत्रक जमा रु.१३३० कोटी ३२ लक्ष ५० हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक रु.६९ कोटी ३८ लक्ष १९ हजार असे एकुण रु.१३९९ कोटी ७० लक्ष ६९ हजार जमा व खर्च रु.१३९९ कोटी ४५ लक्ष ५० हजार विचारात घेऊन रु.२५ लक्ष १९ हजार शिल्लकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०० नुसार सर्वानुमते अंतिम मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी),
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.